पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा - 2017
परीक्षा दिनांक - 24/12/2017

**A** → संच क्रमांक

**2017**

**W10**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.** 205045

# प्रश्नपुस्तिका-II
# विधी ( इतर कायदे )

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 75
एकूण गुण : 150

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 75 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉल्पेनने** लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉल्पेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

1. महाराष्ट्र मोटर वाहन नियम, 1989 नुसार ________ पदा पेक्षा कमी नसलेला कोणताही अधिकारी जनतेस धोकादायक असण्याची शक्यता असलेले मोटर वाहनास थांबवून परिक्षण करू शकतो.

(1) पोलीस अधीक्षक (2) वाहतूक आयुक्त

(3) पोलीस महानिरीक्षक (4) मोटर वाहन सहाय्यक निरीक्षक

As per Maharashtra Motor Vehicle Rules 1989, any officer, not below the rank of ________ may stop and examine any motor vehicle likely to constitute danger to public.

(1) Superintendent of Police (2) Transport Commissioner

(3) Inspector General of Police (4) Assistant Inspector of Motor Vehicles

---

2. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनांमधील) हितसंबंधाचे रक्षण अधिनियम, 1999 चा खालीलपैकी कोणता उद्देश आहे ?

(1) वित्तीय आस्थापना निर्माण करणे

(2) उच्च व्याज उपलब्ध करून देणे

(3) वित्तीय आस्थापनांच्या ठेवीदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करणे

(4) महाराष्ट्रात एकसारखी वित्तीय पद्धती आणणे

Among following what is the object of Maharashtra Protection of interests of Depositors (into Financial Establishment) Act, 1999.

(1) To establish banking institution

(2) To provide high rates of interest

(3) To curb the uncrupulous activities of financial establishments

(4) To have uniform banking system in Maharashtra

---

3. गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ, अधिनियम 1985 च्या ________ कलमामध्ये अधिकाऱ्याला वाहन थांबविण्याचे आणि त्याची झडती घेण्याचे अधिकार दिलेले आहेत.

(1) 43 (2) 44 (3) 49 (4) 51

Under section ________ of the N.D.P.S. Act 1985 the officer is empowered to stop and search conveyance.

(1) 43 (2) 44 (3) 49 (4) 51

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

4. जोड्या लावा :

| कलम ( महाराष्ट्र पोलीस अधिनियम ) | | तरतूद |
|---|---|---|
| (a) 64 | (i) | पोलिसांचे वाजवी आदेश पाळण्याचे लोकांवर बंधन |
| (b) 66 | (ii) | जनते संबंधी पोलीस अधिकाऱ्यांची कर्तव्ये |
| (c) 67 | (iii) | पोलीस अधिकाऱ्याची कर्तव्ये |
| (d) 68 | (iv) | पोलीसांनी रस्त्यावरील रहदारीचे नियमन करणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

Match the following :

| Section (Maharashtra Police Act) | | Provision |
|---|---|---|
| (a) 64 | (i) | Persons bound to conform to reasonable order of police. |
| (b) 66 | (ii) | Duties of Police Officers towards the public. |
| (c) 67 | (iii) | Duties of a Police Officer. |
| (d) 68 | (iv) | Police to regulate traffic etc. in streets. |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

---

5. मुलांचे लैंगिक गुन्ह्यांपासुन संरक्षण अधिनियम, 2012 नुसार ''मुल'' म्हणजे :

(1) 18 वर्षाखालील व्यक्ती
(2) 16 वर्षाखालील व्यक्ती
(3) 14 वर्षाखालील व्यक्ती
(4) वरीलपैकी नाही

As per protection of children from Sexual Offence Act, 2012, "child" means :

(1) Person below age of 18 years
(2) Person below age of 16 years
(3) Person below age of 14 years
(4) None of above

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

6. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम 2012 नुसार खोटी फिर्याद केल्यास पुढील शिक्षा होते :

(1) सहा महिने (2) एक वर्ष

(3) तीन वर्ष (4) वरीलपैकी नाही

Punishment for making false complaint under protection of children from sexual offences Act 2012 is :

(1) Six months (2) 1 year

(3) 3 years (4) None of above

---

7. "सक्षम प्राधिकरण" ही व्याख्या महाराष्ट्र ठेवीदारांचा हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम 1999 चा पुढील कलमात दिलेली आहे.

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

The definition of competent Authority is given under following section of Maharashtra Protection of Interest of Depositors Act 1999.

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

---

8. महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम 2(10) नुसार __________ ची व्याख्या केलेली आहे.

(1) भोजनालय

(2) सार्वजनिक स्थळ

(3) मनोरंजनाचे सार्वजनिक स्थळ

(4) करमणूकीचे सार्वजनिक स्थळ

Section 2(10) of Maharashtra Police Act defines __________.

(1) eating home

(2) public place

(3) place of public amusement

(4) place of public entertainment

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

9. जोड्या जुळवा.

| मोटर वाहन अधिनियम - 1988 | | कलम | |
|---|---|---|---|
| (a) | भरधाव वाहन चालविणे | (i) | कलम 189 |
| (b) | धोकादायकपणे वाहन चालविणे | (ii) | कलम 185 |
| (c) | प्रमाणाबाहेर दारू प्यायलेल्या व्यक्तिने वाहन चालविणे | (iii) | कलम 184 |
| (d) | स्पर्धा आणि वेगाची पारख | (iv) | कलम 183 |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

Match the pairs :

| Motor Vehicles Act, 1988 | | Section | |
|---|---|---|---|
| (a) | Driving at excessive speed | (i) | Section 189 |
| (b) | Driving dangerously | (ii) | Section 185 |
| (c) | Driving by drunken person | (iii) | Section 184 |
| (d) | Racing and trials of speed | (iv) | Section 183 |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

10. नागरी हक्क संरक्षण कायदा, 1955 नुसार 'अस्पृश्यतेवर' आधारित अपमान अथवा अपमानाचे प्रयत्न करणे कलम ________ नुसार शिक्षेस पात्र ठरतात.

(1) 5 (2) 6 (3) 7 (4) 8

Insults or attempts to insult, on ground of 'untouchability' shall be punishable as per section ________ of the Protection of Civil Rights Act, 1955.

(1) 5 (2) 6 (3) 7 (4) 8

11. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या कलम ________ मध्ये दावा न सांगितलेली मालमत्ता पोलीसांना ताब्यात घेण्याचा अधिकार आहे.

(1) 80 (2) 81 (3) 82 (4) 99

As per section ________ of the Maharashtra Police Act, 1951 the police are empowered to take charge of unclaimed property.

(1) 80 (2) 81 (3) 82 (4) 99

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

12. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 च्या उद्देशिकेमध्ये खालीलपैकी कोणत्या कायद्याचा सुधारणा करणेबाबत समावेश नाही ?

(1) फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

(2) भारतीय दंड संहिता, 1860

(3) रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियम, 1934

(4) दी बँकर्स बुक साक्षीपुरावा अधिनियम, 1891

In the context of Preamble of Information Technology Act, 2000, find out the Act which is not mentioned under it for amendment :

(1) The code of criminal procedure, 1973

(2) The Indian Penal Code, 1860

(3) Reserve Bank of India Act, 1934

(4) The Bankers Book Evidence Act, 1891

---

13. शस्त्र अधिनियम 1959 च्या कलम 2(क) नुसार शस्त्राच्या व्याख्येमध्ये खालील कशाचा समावेश होत नाही ?

(1) लाठी

(2) घरगुती वापराच्या वस्तु

(3) खेळणी

(4) वरील सर्व जोपर्यंत त्यांचा वापरायोग्य आयुधे म्हणून रूपांतरित होऊ शकत नाहीत

As per Section 2(C) of the Arms Act 1959 which of the following do not comes under the definition of Arm ?

(1) A lathi

(2) Articles of domestic use

(3) Toys

(4) All the above unless they being converted into serviceable weapons

---

14. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्याच्या 1887 च्या कलम ________ अन्वये पोलीस अधिकाऱ्यास जुगार चे साहित्य दडविलेले असल्याचा संशयास कारण असल्यास त्यास घरात प्रवेश करून सर्व भाग, खोल्या, जागेची तपासणी करण्याचे अधिकार आहे.

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

The Police Officer is empowered to enter in a house and search all parts of house room or place if he has reason to suspect that any instrument of gaming are concealed therein, as per section ________ of Maharashtra Prevention of Gambling Act, 1887.

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**15.** माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2000 मधील पुढील कलमात कंपनीकडून होणाऱ्या गुन्ह्यांबाबत तरतूद आहे.

(1) 82 (2) 85 (3) 78 (4) 67

Provisions relating to offences by companies are given under following section of Information Technology Act 2000.

(1) 82 (2) 85 (3) 78 (4) 67

---

**16.** चालकाने रहदारीचा चिन्हांचे पालन करणेबाबत तरतूद मोटर वाहन अधिनियम 1988 चा पुढील कलमात दिलेले आहे.

(1) 95 (2) 119 (3) 190 (4) 209

Duty to obey traffic signs by driver is provided under following section of Motor Vehicle Act 1988.

(1) 95 (2) 119 (3) 190 (4) 209

---

**17.** महाराष्ट्र प्रतिबंध अधिनियमाच्या कलम 68 नुसार जो कोणी सार्वजनिक स्थळावर दारूचा गुत्ता चालवेल त्यास दोषी आढळल्यास पहिल्या गुन्ह्यासाठी _________ कैद व दंडाची तरतूद आहे.

(1) 6 वर्षे, दंड नाही (2) 4 वर्षे, दंड ₹ 1000 पर्यंत

(3) 5 महिनेपर्यंत आणि दंड नाही (4) 6 महिनेपर्यंत कैद आणि दंड ₹ 500 पर्यंत

As per Section 68 of Maharashtra Prohibition Act, a person who opens any place as a common drinking house shall on conviction for first time punished with imprisonment for a term _________ and also with fine _________.

(1) 6 years, no fine (2) 4 years, fine upto ₹ 1000

(3) Upto 5 months and no fine (4) Upto six months and fine upto ₹ 500

---

**18.** माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 च्या कलम 2 (*l*) _________ ची व्याख्या करते.

(1) डेटा (2) संगणक

(3) संगणक प्रणाली (4) संगणक जाळे

Section 2 (*l*) of Information Technology Act, 2000 defines _________.

(1) data (2) computer

(3) computer system (4) computer network

---

**19.** अनुसूचित जाती अनुसूचित जमातीचा नसलेल्या लोकसेवकाने अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा 1989 खाली कर्तव्ये पार पाडण्यास हयगय केली तर _________ कलमा खाली अपराध होतो.

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

A public servant but not being a member of scheduled caste or scheduled tribe willfully neglects his duties, is an offence under section _________ of Scheduled Caste and Scheduled Tribe (Prevention of Atrocities) Act, 1989.

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

20. कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याने न्यायोचित (कायदेशीर) मोबदल्या व्यतिरिक्त अन्य वस्तू स्वीकारल्यास त्यास लाचलुचपत प्रतिबंध कायदा, 1988 च्या कलम 7 नुसार _________ पेक्षा कमी नसलेली कारावासाची व जी _________ पर्यंत वाढू शकते अशी शिक्षा होते.

(1) सहा महीने; 2 वर्षे (2) सहा महीने; 5 वर्षे
(3) एक वर्ष; 4 वर्षे (4) दोन वर्षे; 7 वर्षे

A public servant taking gratification, other than legal remuneration shall be punishable with imprisonment not less than _________ but which may extend to _________ years as per section 7 of Prevention of Corruption Act, 1988.

(1) Six months; 2 years (2) Six months; 5 years
(3) One year; 4 years (4) Two years; 7 years

---

21. भांगेची बेकायदेशीररित्या लागवड करणे व ती गोळा करणे आणि इतर गोष्टींबद्दल शिक्षेसंदर्भात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 च्या कोणत्या कलमाअन्वये तरतूद आहे?

(1) कलम 64 (2) कलम 65
(3) कलम 66 (4) कलम 67

Which provision of the Maharashtra Prohibition Act, 1949 provide punishment for illegal cultivation and collection of hemp and other matters ?

(1) Section 64 (2) Section 65
(3) Section 66 (4) Section 67

---

22. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम 1999 च्या कलम 14 नुसार तारेने पाठवलेला इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार कोणाला दिलेला आहे?

(1) अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक
(2) पोलीस अधीक्षक
(3) उप-पोलीस अधीक्षक
(4) पोलीस निरीक्षक

Under section 14 of the Maharashtra Control of organised Crime Act, 1999, to whom of the following the authorisation of interception of wire, electronic or oral communication is given :

(1) Additional Inspector General
(2) Superintendent of Police
(3) Deputy Superintendent of Police
(4) Inspector of Police

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

23. महाराष्ट्र मोटर वाहन नियम 1989 चे कलम 95 पुढील तरतूद करते :

(1) अनुज्ञापत्र सादर करणे (2) अनुज्ञापत्र रद्द करणे

(3) अनुज्ञापत्र मान्यता देणे (4) वरीलपैकी सर्व

Section 95 of Maharashtra Motor Vehicle Rules 1989 provides about :

(1) Production of Permit (2) Cancellation of Permit

(3) Grant of Permit (4) All of above

---

24. लोक प्रतिनिधित्व अधिनियम 1951 च्या कोणत्या प्रकरणात निवडणूक विषयक अपराध याबद्दल उल्लेख केला आहे ?

(1) प्रकरण एक (2) प्रकरण दोन (3) प्रकरण तीन (4) प्रकरण चार

Which chapter of the Representation of People Act, 1951 deals with electoral offences ?

(1) Chapter I (2) Chapter II (3) Chapter III (4) Chapter IV

---

25. नागरी हक्क संरक्षण कायद्याच्या कलम ________ अन्वये या कायद्याखाली असणाऱ्या गुन्ह्यास चिथावणी देणाऱ्यास त्या गुन्ह्या ऐवढीच शिक्षा होईल.

(1) 9 (2) 10 (3) 10-A (4) 11

Who ever abets any offence under the Protection of Civil Rights Act, shall according to section ________ be punished with punishment provided for the offence.

(1) 9 (2) 10 (3) 10-A (4) 11

---

26. एम.पी.डी.ए. कायदा 1981 च्या एका उद्दिष्टाने गुंड व अवैध दारू विक्रेते यांना ________ करण्याची तरतूद आहे.

(1) न्यायाधीकरण (2) जामीन

(3) प्रतिबंध स्थानबद्धता (4) आयोग

One of the objective of M.P.D.A. Act, 1981 is to provide for ________ of slumlords and Bootleggers.

(1) Tribunal (2) Bail

(3) Preventive detention (4) Commission

---

27. गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, 1985 मधील कोणत्या तरतुदीनुसार भांगेचे झाड व भांग यांच्या संबंधातील उल्लंघनाबद्दल शिक्षेचा उल्लेख केलेला आहे ?

(1) कलम 17 (2) कलम 18 (3) कलम 19 (4) कलम 20

Which provision of Narcotic Drugs and Psychotropic Substances Act, 1985 deals with the punishment for contravention in relation to Cannabis and Cannabis plant ?

(1) Section 17 (2) Section 18 (3) Section 19 (4) Section 20

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

28. शस्त्र अधिनियम 1959 च्या कलम 3 प्रमाणे कोणत्याही अपराधांसंबंधात कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही अभियोग दाखल करण्याकरिता पूर्व अट कोणती आहे ?

(1) जिल्हा पोलीस अधीक्षकांची पूर्वमंजूरी
(2) जिल्हा दंडाधिकाऱ्यांची पूर्वमंजूरी
(3) जिल्हा न्यायाधिशांची पूर्वमंजूरी
(4) वरीलपैकी काहीही नाही

What is the condition precedent to institute prosecution against any person in respect of any offence under section 3 of Arms Act, 1959.

(1) Previous Sanction of District Superintendent of Police
(2) Previous Sanction of District Magistrate
(3) Previous Sanction of District Judge
(4) None of the above

---

29. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 अंतर्गत चौकशी काम पुढील व्यक्ती करते :

(1) पोलीस निरीक्षक
(2) पोलीस उपअधीक्षक
(3) जिल्हा न्यायाधीश
(4) वरीलपैकी सर्व

Investigation under Information Technology Act, 2000 is done by :

(1) Police Inspector
(2) Deputy Superintendent of Police
(3) District Judge
(4) All of above

---

30. महाराष्ट्र धोकादायक उपक्रम प्रतिबंध अधिनियम 1981 नुसार "झोपडपट्टीदार" म्हणजे असा व्यक्ती ज्याने :

(1) बेकायदेशीर रित्या कोणत्याही जमिनीचा ताबा घेतो
(2) बेकायदेशीर भाडेकरार करतो
(3) बेकायदेशीर बांधकाम करतो
(4) वरीलपैकी सर्व

As per Maharashtra Prevention of Dangerous Activities Act 1981, slumlord means a person who :

(1) Illegally takes possession of any land
(2) Creates illegal tenancies
(3) Constructs unauthorised structure
(4) All of above

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

31. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, 1999 नुसार "_________" म्हणजे कोणत्याही व्यक्तिने गुन्हेगारी संघटनेचा घटक म्हणून हिंसा व बंडखोरीचा वापर करून कोणतेही बेकायदेशीर कृत्य करणे होय.

(1) घातक व्यक्ती (2) अवैध दारू विक्रेता

(3) संघटीत गुन्हेगारी (4) स्थानबद्ध

As per Maharashtra Control of Organised Crime Act, 1999 "_________" means any unlawful activity by an individual, as a member of crime syndicate by use of violence or promoting insurgency.

(1) Dangerous person (2) Bootlegger

(3) Organised crime (4) Detenu

---

32. अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम 1989 चा कलम 3(1) नुसार पुढील कारावासाची शिक्षा होते.

(1) 3 महिने ते 6 महिने (2) 6 महिने ते 1 वर्ष

(3) 6 महिने ते 3 वर्ष (4) 6 महिने ते 5 वर्ष

Punishment under section 3(1) of SC and ST (Prevention of Atrocities) Act 1989 is imprisonment for :

(1) 3 months to 6 months (2) 6 months to 1 year

(3) 6 months to 3 years (4) 6 months to 5 years

---

33. सार्वजनिक ठिकाणी जुगार खेळणे ह्या गुन्ह्यासाठी महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्याच्या _________ कलमाखाली शिक्षेची तरतूद केली आहे.

(1) 12 (2) 13 (3) 14 (4) 15

Punishment is prescribed in section _________ for gaming in public place under Maharashtra Prevention of Gambling Act.

(1) 12 (2) 13 (3) 14 (4) 15

---

34. बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण)कायदा 2000 कलम 4 नुसार राज्य सरकार प्रत्येक जिल्ह्यात न्यायाच्या विरोधी असलेल्या अल्पवयीन संबंधी एक किंवा जास्त _________ चे गठन करते.

(1) अल्पवयीन पोलीस मंडळ (2) निरीक्षण अधिकारी मंडळ

(3) परिविक्षण अधिकारी मंडळ (4) बाल न्याय मंडळ

As per section 4 of the Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2000, the State Government shall constitute for every district one or more _________ in relation to Juveniles in conflict with law.

(1) Juvenile Police Board (2) Observation Officers Board

(3) Probation Officers Board (4) Juvenile Justice Board

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

35. बालकांबाबत न्यायनियम कायदा 1986 हा ________ न्वये संपुष्टात आला.

(1) बालकांबाबत कायदा

(2) बालकांबाबताचे हक्क

(3) बालकांबाबत न्यायनियम (बालकांची काळजी व संरक्षण) कायदा 2000

(4) बालकांबाबत न्यायनियम (काळजी व संरक्षण) कायदा 2002

The Juvenile Justice Act 1986 was repealed by ________ .

(1) Children Act

(2) Rights of Children

(3) Juvenile Justice (Care and Protection of Children) Act 2000

(4) Juvenile Justice (Care and Protection) Act 2002

---

36. महाराष्ट्र पोलीस अधिनियम मधील कलम 115 अंतर्गत पुढीलपैकी कशाच्या संदर्भात तरतूद आहे?

(1) रस्त्यावरील प्रवाशांना अडथळा करणे

(2) रस्त्यात किंवा रस्त्याजवळ उपद्रव करणे

(3) सार्वजनिक इमारतीतील नोटीशीकडे दुर्लक्ष करणे

(4) पतंग उडविण्यास मनाई

Section 115 of Maharashtra Police Act has provision regarding :

(1) Obstructing passengers in the street

(2) Committing nuisance in or near street

(3) Disregard of notice in public building

(4) Prohibition against flying kite

---

37. मानसिक दृष्ट्या आजारी व्यक्तिच्या संबंधात पोलीस अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य हे मानसिक आरोग्य कायदा 1987 च्या कलम ________ मध्ये दिले आहे.

(1) 23 (2) 25 (3) 26 (4) 28

The powers and duties of Police Officer for mentally ill people are discussed in section ________ of Mental Health Act, 1987.

(1) 23 (2) 25 (3) 26 (4) 28

---

38. बालकांचे न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम 2000 नुसार मुलास दारू दिल्यास पुढील शिक्षा होते :

(1) तीन वर्ष कैद (2) तीन वर्ष कैद व दंड

(3) फक्त दंड (4) वरीलपैकी नाही

Penalty for giving intoxicating liquor to child under Juvenile Justice (Care and Protection of Children) Act 2000 is :

(1) Imprisonment for three years (2) Imprisonment for three years and fine

(3) Fine only (4) None of above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

39. पोलीस उपअधीक्षक किंवा समकक्ष पोलीस अधिकारी हे लाचलुचपत प्रतिबंध कायदा 1988 च्या कलम ________ नुसार दंडात्मक गुन्ह्याचा तपास करतात.

(1) 17 - ए (2) 17 - बी (3) 17 - सी (4) 17 - डी

The Deputy Superintendent of Police or the Police Officer of equal rank shall investigate offence punishable under the Prevention of Corruption Act, 1988 as per section ________.

(1) 17 - a (2) 17 - b (3) 17 - c (4) 17 - d

---

40. महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ________ नुसार पोलीस अधिकारी हे नेहमी कामावर असतात असे गृहीत धरले जाते.

(1) 15 (2) 16 (3) 28 (4) 29

Section ________ of Maharashtra Police Act declares that the Police Officer are deemed to be always on duty.

(1) 15 (2) 16 (3) 28 (4) 29

---

41. जिल्हा दंडाधिकारी यांना कोणत्या कलमान्वये इन्क्वेस्ट पंचनामा करण्याचा अधिकार आहे ?

(1) भारतीय दंड संहिता कलम 174 (2) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 176

(3) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 174 (4) कोणत्याही कलमान्वये नाही

Under which section of the following Acts does the District Magistrate have the power to perform inquest Panchnama ?

(1) Section 174 of I.P.C. (2) Section 176 of Cr.P.C.

(3) Section 174 of Cr.P.C. (4) None of the above

---

42. आरोपींना अटक करताना, पोलीसांनी सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील केसमधील, मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे ?

(1) डी.डी. बासू वि. भारत सरकार

(2) जगदीश नरेन वि. उत्तर प्रदेश

(3) डी.के. बासू वि. पश्चिम बंगाल

(4) परमजीत कौर वि. पंजाब

While arresting a person, it is mandatory for police, to follow the guidelines of which of the Supreme Court Case ?

(1) D.D. Basu vs. Government of India

(2) Jagdish Naren vs. State of Uttar Pradesh

(3) D.K. Basu vs. State of West Bengal

(4) Paramjit Kaur vs. State of Punjab

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**43.** कलम 165 फौजदारी दंड प्रक्रिया संहिता अन्वये ________ झडती घेवू शकतो.

(1) पोलीस ठाणे अंमलदार (2) तपासी अधिकारी

(3) वरील दोन्ही (4) वरीलपैकी कोणीही नाही

Under section 165 Cr.P.C. ________ can conduct search.

(1) Incharge of police station (2) Investigation officer

(3) Both (1) and (2) (4) None of the above

---

**44.** मा. सर्वोच्च न्यायालयाने अटकेसंबंधी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार खालीलपैकी कोणते तत्व गैर लागू आहे ?

(1) अटक केलेल्या व्यक्तीचे नातेवाईक/मित्र जर शहर/जिल्ह्याबाहेर रहात असतील तर त्यांना अटकेबाबत अटकेच्या वेळेपासून 48 तासात कळवले पाहिजे.

(2) अटक व्यक्तिला वकिलांना भेटण्याची परवानगी देण्यात यावी.

(3) अटकेसंबंधीचे कागदपत्र संबंधित मॅजिस्ट्रेटकडे त्वरित पाठवण्यात आले पाहिजे.

(4) अटक किंवा चौकशीला ताब्यात घेतलेल्या व्यक्तिला त्या बाबत त्याचे नाते-वाईकांना कळविण्याचा हक्क आहे याची जाणीव करून द्यावी.

Which of the following is not applicable in the event of an arrest according to guidelines laid down by Hon. Supreme Court ?

(1) If the relatives/friends of the arrested person stays in other district/city then they should be informed about the arrest within 48 hrs of arrest.

(2) The arrested person should be allowed to meet his/her lawyer.

(3) The arrest form should be immediately forwarded to concerned Magistrate.

(4) The arrested person should be informed of his right to inform his relatives in the event of his arrest.

---

**45.** सऱ्हाईत गुन्हेगाराकडून चांगल्या वागणुकीसाठी जामिन फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या ________ अन्वये घेतात.

(1) कलम 110 (2) कलम 106 (3) कलम 109 (4) कलम 107

Security for good behaviour from habitual offender is taken under ________ section of Cr.P.C.

(1) Section 110 (2) Section 106 (3) Section 109 (4) Section 107

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

46. कलम 27 भारतीय साक्षपुरावा अधिनियमाप्रमाणे केला जाणारा निवेदन पंचनामा हा केंव्हा केला जाऊ शकतो ?
(1) आरोपी पोलीस कोठडीत असताना
(2) आरोपी न्यायालयीन कोठडीत असताना
(3) आरोपी जामीनावर असताना
(4) न्यायालयाच्या परवानगीने
When does a Memorandum Panchnama done under section 27 of Indian Evidence Act ?
(1) When accused is in police custody
(2) When accused in magisterial custody
(3) When accused is on bail
(4) With the permission of the court

47. मरणान्वेषण पंचनामा, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कोणत्या कलमान्वये केला जातो ?
(1) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 174 (2) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 164
(3) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 102 (4) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 154
Under which section of code of Criminal Procedure, Inquest Panchnama is conducted ?
(1) Cr.P.C. 174 (2) Cr.P.C. 164
(3) Cr.P.C. 102 (4) Cr.P.C. 154

48. न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे शवविच्छेदनानंतर परीक्षणाकरिता पाठवायच्या वस्तूंना मोहोरबंद ________ करतात.
(1) तपासी अधिकारी (2) वैद्यकीय अधिकारी
(3) न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा (4) वरीलपैकी कोणीही नाही
After the conduct of postmortem who seals the parcels which are to be sent to Forensic Lab ?
(1) Investigating Officer (2) Medical Officer
(3) Forensic Lab (4) None of the above

49. दोषसिद्धी झाल्यावर शांतता राखण्यासाठी फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या कलम 106 अन्वये घेतले जाणारे जामिनाचे बंधपत्र ________ वर्षाचे असते.
(1) 1 वर्षा पेक्षा जास्त नाही (2) 3 वर्षा पेक्षा जास्त नाही
(3) 2 वर्षा पेक्षा जास्त नाही (4) 5 वर्षा पेक्षा जास्त नाही
Bond with sureties for keeping the peace under section 106 of Cr.P.C. can be taken for ________ years.
(1) Not exceeding 1 year (2) Not exceeding 3 years
(3) Not exceeding 2 years (4) Not exceeding 5 years

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

50. फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या कोणत्या कलमान्वये विवक्षित मालमत्ता ताब्यात घेण्याचा पोलीसांना अधिकार आहे ?

(1) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 102 (2) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 104

(3) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 92 (4) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 100

According to which section of Cr.P.C. can police seize suspicious property ?

(1) Section 102 of Cr.P.C. (2) Section 104 of Cr.P.C.

(3) Section 92 of Cr.P.C. (4) Section 100 of Cr.P.C.

---

51. आयडेंटी किट पद्धत कोणी शोधून काढली ?

(1) बर्टिलॉन (2) मॅकडोनाल्ड

(3) केल्व्हीन गोडार्ड (4) मॅथ्यू ऑरफिला

Identy kit method discovered by ________.

(1) Bertillon (2) Macdonald

(3) Kelvin Goddard (4) Mathieu Orfila

---

52. मूत्र व घाम यांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यासाठी खालील किरणांचा वापर करतात :

(1) इन्फ्रारेड किरण (2) अल्ट्राव्हायोलेट किरण

(3) क्ष-किरण (4) लेझर किरण

To examine urine and sweat, which of the following is used ?

(1) Infrared rays (2) Altraviolet rays

(3) X-rays (4) Laser rays

---

53. पोलीस तपासात अतिनील किरणांचा उपयोग पुढील कामासाठी करतात :

(1) वादग्रस्त दस्ताऐवजामधील खाडाखोड/अदलाबदल तपासणे.

(2) रक्त, वीर्य, मूत्र, लाळ इ. डाग तपासणे.

(3) न दिसणाऱ्या द्रवाने लिहलेली अक्षरे/लिखाण ओळखणे.

(4) वरीलपैकी सर्व.

In police investigation, ultraviolet rays are used for which of the following purpose ?

(1) To check the changes in disputed documents.

(2) To check the stains of blood, semen, urine, saliva.

(3) The writings done by invisible material.

(4) All of the above.

---

54. कोर्ट कन्व्हीक्शन स्लिपचा फॉर्म नं ________.

(1) पी.एम. 61 ए.ई. (2) पी.एम. 61 ई. (3) पी.एम. 61 ई.एफ. (4) पी.एम. 61 एफ.

Form number of court conviction slip is ________.

(1) PM 61 AE (2) PM 61 E (3) PM 61 EF (4) PM 61 F

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

55. पोलीस स्टेशनमध्ये, हिस्ट्रीशिटस् (पूर्ववृत्त पत्रके) कोणाची सुरू करतात ?

(1) अभिलेखावरील सर्व गुन्हेगारांची

(2) पोलीस स्टेशनमधील निगराणी नोंदवहीत ज्यांची नावे आहेत अशा गुन्हेगारांची

(3) बाल गुन्हेगारांची

(4) पोलीस स्टेशन हद्दीतील फरारी आरोपींची

In police station, Historysheet is maintained for which of the following ?

(1) All criminals on record

(2) Criminals whose names are in surveillance register of police station

(3) Juveniles in conflict with law

(4) Absconders under the jurisdiction of the police station concerned

---

56. डिटोनेटर हे उपकरण कोणत्या क्रियेसाठी वापरतात ?

(1) स्फोट घडवण्यासाठी (2) हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी

(3) पाणी शुद्ध करण्यासाठी (4) विद्युत भार तयार करण्यासाठी

For which action the device detonator is used ?

(1) Explosions (2) Heart Treatment

(3) Water purification (4) Preparation of Electricity

---

57. गुन्हाच्या संदर्भातील मुद्देमालात रक्ताबाबतची तपासणी करण्यासाठी कोणती तपासणी करण्यात येते ?

(1) टीएलसी तपासणी (2) बेंझीडिन तपासणी

(3) फ्लोरीन तपासणी (4) अल्कोहोल तपासणी

Which of the following tests is used for testing of presence of blood in Crime Cases ?

(1) TLC test (2) Benzidine test

(3) Fluorine test (4) Alcohol test

---

58. हायड्रोसायनिक ॲसिड मुख्यत्वेकरून _________ पासून मिळते.

(1) धान्य (2) फळे (3) पाणी (4) माती

Hydrocyanic acid is generally found in _________.

(1) Grains (2) Fruits (3) Water (4) Earth

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

59. सर्पदंशामुळे मृत्यु झाल्यास न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेत रासायनिक परीक्षणासाठी __________ पाठवितात.

(1) सापाचे विष
(2) सापाने दंश केलेल्या ठिकाणची कातडी
(3) साप
(4) साप चावलेल्या ठिकाणची माती

In case of death due to snake bite __________ exhibit forwarded to forensic science laboratory.

(1) Snake venom
(2) Skin with bite mark
(3) Snake
(4) The earth from snake bite place

---

60. मनुष्य प्राण्यांमध्ये खालीलपैकी कोणता गुणधर्म सारखा असु शकत नाही ?

(1) रक्तगट (2) उंची (3) रंग (4) फिंगरप्रिंट

Which of the following characteristics cannot be same in human individuals ?

(1) Blood group (2) Height (3) Colour (4) Fingerprint

---

61. __________ हे स्मॅक नावानेही ओळखले जाते.

(1) हेरॉईन (2) बारबिच्युरेट (3) कॅनाबीस (4) कोकेन

__________ is also known as smack.

(1) Heroin (2) Barbiturate (3) Cannabis (4) Cocaine

---

62. शस्त्राच्या हल्ल्यापासून बचाव करणाऱ्या व्यक्तीला खालील ठिकाणी बचावाच्या जखमा होणे संभवत नाही.

(1) हातांचे तळवे
(2) हातांची बोटे
(3) दंड
(4) पोट

While defending an assault by weapon, defence wound on a person is not likely to be caused on following part.

(1) Palms of hands
(2) Fingers of hands
(3) Arms
(4) Abdomen

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

63. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या शिफारसीनुसार कोणत्या परिस्थितीत शवविच्छेदन परीक्षण ध्वनिचित्रमुद्रीत केले पाहीजे ?

(1) मनुष्यवध
(2) स्त्रिभ्रूण हत्येच्या केस मधे झालेला मृत्यू
(3) वैद्यकीय निष्काळजीपणामुळे झालेला मृत्यू
(4) तुरुंगवास भोगत असलेल्या व्यक्तीचा तुरुंगात झालेला मृत्यू

As per the recommendations of National Human Rights Commission, in which condition the postmortem examination is videotaped ?

(1) Homicide
(2) Death due to female foeticide
(3) Death due to medical negligence
(4) Death of a convicted person in prison

---

64. मृत्यूनंतर उलटलेला कालावधी ठरविण्यात खालील बाबींची मदत होऊ शकते :

(1) मृतदेहाचा ताठरपणा (2) मृतदेहावरील जखमांची संख्या
(3) मयताचा रक्तगट (4) यापैकी कोणतेही नाही

Following can be helpful in determining time elapsed after death :

(1) Rigor mortis (2) Number of wounds on dead body
(3) Blood group of deceased (4) None of the above

---

65. शवविच्छेदन परीक्षणामुळे मनुष्यवधाच्या प्रकरणी खालीलपैकी कोणती माहिती मिळू शकते ?

(1) मृत्यूचे कारण (2) मृत्यूची अंदाजे वेळ
(3) वापरलेले हत्यार (4) वरीलपैकी सर्व

Which of the following information can be obtained after postmortem examination in a case of homicide ?

(1) Cause of death (2) Approximate time of death
(3) Weapon used (4) All of the above

---

66. अग्निशस्त्र प्रकरणी शरीरावर गोळी आत शिरल्याची एक जखम असेल तर गोळी बाहेर येण्याच्या किती जखमा दिसू शकतील ?

(1) एक (2) एकापेक्षा जास्त (3) एकही नाही (4) यापैकी कोणतेही

How many exit wounds can be seen on the body if one entry wound is present in firearm case ?

(1) One (2) More than one (3) Nil (4) Any of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

67. स्वत:ने शरीरावर करून घेतलेल्या जखमा ________ असण्याची जास्तीत जास्त शक्यता असते.

(1) कापीव जखम (2) मुका मार

(3) जळाल्याची जखम (4) ग्रेझ

Self inflicted wounds are most likely to be ________.

(1) Incised wounds (2) Contusion

(3) Burn injury (4) Graze abrasion

---

68. खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत मृतदेह कुजण्याची प्रक्रिया सर्वात लवकर होईल ?

(1) मृतदेह जमिनीत पुरल्यास (2) मृतदेह पाण्यात राहिल्यास

(3) मृतदेह उघड्यावर ठेवल्यास (4) मृतदेह बर्फाने झाकून ठेवल्यास

In which of the following circumstances, dead body putrefaction will be earliest ?

(1) Dead body buried in soil (2) Dead body lying in water

(3) Dead body kept in open air (4) Dead body covered with ice

---

69. खालीलपैकी कोणता साप बिनविषारी आहे ?

(1) धामण (2) मण्यार

(3) घोणस (4) नाग

Which of the following is a non-poisonous snake ?

(1) Rat Snake (2) Krait

(3) Russel's Viper (4) Cobra

---

70. खालीलपैकी कोणती चाचणी बंदुकीच्या दारूचे अंश शोधण्यासाठी केली जाते ?

(1) डरमल नाईट्रेट टेस्ट (2) रक्त घटक टेस्ट

(3) क्ष-किरण टेस्ट (4) ल्यूमिनोल टेस्ट

Which of the following test is carried out to detect Gun Shot Residue (G.S.R.) ?

(1) Dermal Nitrate Test (2) Blood group test

(3) X-ray test (4) Luminol test

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

71. मानव अधिकाराचे वैश्विक घोषणापत्रासंबंधात खालील विधानांचा विचार करा :

(a) संयुक्त राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक परिषदेअंतर्गत काम करणाऱ्या मानव अधिकार आयोगाने हे घोषणापत्र तयार केले होते.

(b) सर्व राज्यांवर (States) हे घोषणापत्र कायद्याने बंधनकारक आहे.

(c) घोषणापत्रात फक्त नागरी व राजकीय अधिकारच नाही तर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांचा पण समावेश आहे.

(d) घोषणापत्राच्या कलम - पाच [5] नुसार छळ, अमानवीय वा मानहानीकारक वागणूक व शिक्षेस प्रतिबंध करण्यात आला आहे.

वरीलपैकी कुठले/ली विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) व (b) बरोबर आहेत.

(2) फक्त (c) व (d) बरोबर आहेत.

(3) (a), (b), (c), (d) बरोबर आहेत.

(4) फक्त (a), (c) व (d) बरोबर आहेत.

Consider following statements as regards Universal Declaration of Human Rights :

(a) That it was prepared by the Human Rights Commission working under the Economic and Social Council of the (UN) United Nation.

(b) That it is legally binding upon all the States.

(c) It contains not only civil and political rights but also economic, social and cultural rights.

(d) Article Five [5] of it prohibits torture, inhuman or degrading treatment or punishment.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Only (a) and (b) are correct.

(2) Only (c) and (d) are correct.

(3) All (a), (b), (c) and (d) are correct.

(4) Only (a), (c) and (d) are correct.

---

72. भारतामध्ये कोणत्या राज्यात प्रथम पोलीस प्राधिकरण स्थापन करण्यात आले ?

(1) महाराष्ट्र (2) जम्मू आणि काश्मीर (3) तामिळनाडु (4) गुजरात

Which state established First Police Complaints authority in India ?

(1) Maharashtra (2) J and K (3) Tamil Nadu (4) Gujarat

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

73. खालीलपैकी कुठले खटले हातकडी लावण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांशी संबंधित आहेत ?

(a) प्रेम शंकर शुक्ला विरुद्ध दिल्ली प्रशासन.

(b) सुनील बत्रा विरुद्ध दिल्ली प्रशासन व इतर.

(c) प्रकाश सिंग व इतर विरुद्ध भारतीय संघराज्य.

(d) सिटीझन फॉर डेमोक्रसी विरुद्ध आसाम राज्य व इतर.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) (2) (a), (b), (c), (d) (3) (a), (b), (d) (4) (b), (d)

Which of the following cases are related to the Supreme Court directives on handcuffing ?

(a) Prem Shankar Shukla Vs. Delhi Administration.

(b) Sunil Batra Vs. Delhi Administration and others.

(c) Prakash Singh and others Vs. Union of India.

(d) Citizen For Democracy Vs. State of Assam and others.

**Answer options :**

(1) (a), (b) (2) (a), (b), (c), (d) (3) (a), (b), (d) (4) (b), (d)

---

74. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग सरकारला मानवी हक्कासंदर्भात कोणत्या प्रकारे सूचना करू शकतात ?

(1) पत्राद्वारे (2) वार्षिक अहवालाद्वारे

(3) व्यक्तिगत (4) कधीच सुचवू शकत नाही

National Human Rights Commission can suggest Government regarding Human Rights in __________ way.

(1) By Letter (2) By Annual Report

(3) By Personal (4) Never Suggest to Govt.

---

75. तक्रारीची चौकशी करतांना राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाला दिल्या गेलेल्या अधिकारांचे स्वरूप कोणते असते ?

(1) तपासी अधिकारी (2) फौजदारी न्यायालय

(3) दिवाणी न्यायालय (4) आयोग

National Human Rights Commission while inquiring into complaints shall have the power of :

(1) Investigation Officer (2) Criminal Court

(3) Civil Court (4) Commission

---

-oOo-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

Pick out the correct word to fill in the blank.

Q. No. 201. I congratulate you ________ your grand success.

(1) for (2) at

(3) on (4) about

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) on" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial